दैनिक
लोकसूत्र
यवतमाळ दि. मंगळवार १० नोव्हेंबर २०२६
● वर्ष - पाचवे ● अंक १७८ ● किंमत ३ रु. E-mail : Loksutra@gmail.com RNI NO.MAHMAR/2022/83119

हास्यटोला



सुरेश राऊत (सुदंश)

न्यूज Crime

लोखंडी गजाने डोक्यावर वार

यवतमाळ : घरासमोर येऊन शिवीगाळ करणाऱ्या व्यक्तीला थांबविण्याचा प्रयत्न करणाऱ्या घरमालकावरच लोखंडी गजाने हल्ला चढविल्याची घटना वसंत नगर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या निंबी येथे सात वाजताच्या दरम्यान घडली. निंबी येथील प्रदीप नारायण शिकरे(३२) याच्या घरासमोर करण प्रभू काच गुंडे (२७), आणि शिवा नारायण कोरडे (३०) हे दोघेजण आले आणि त्यांनी शिवीगाळ करणे सुरू केले. त्याचवेळी शिकरे यांनी मला शिवीगाळ करू नका, असे म्हणून थांबविण्याचा प्रयत्न केला असता, उलट आरोपींनीच लोखंडी रॉड आणून त्यांच्या डोक्यावर उजव्या हातावर मारून जखमी केले. याशिवाय लाथा बुक्क्याने मारहाण करून जिवानिशी मारण्याची धमकी दिली. हे भांडण सोडविण्यासाठी शिखरे यांची आई मध्यस्थी करण्यासाठी आली असता तिलाही आरोपींनी शिवीगाळ करून अपमानित केले. या प्रकरणाची तक्रार शिखरे यांनी पोलीस स्टेशनला केल्यावरून पोलिसांनी दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मदतीचे फोटोसेशन हवेत कशाला ?, गरिबी हटाओसह दारिद्र्य निर्मूलन केव्हा ?

गरिबांना मदतवाटपाचे इव्हेंट

■ केशव सवळकर



यवतमाळ : पुरोगामी महाराष्ट्राला दानाची मोठी परंपरा आहे. कर्मयोगी संत गाडगेबाबांनी भुकेलेल्यांना अन्न देणे आणि तहानलेल्यांना पाणी पाजणे हाच खरा धर्म सांगितला, पण त्या बदल्यात जगात स्वत:ची वाहवा मिळविणे हा धर्म नसून तो स्वार्थ आहे असे ते म्हणायचे. मात्र, हल्ली जिल्ह्यासह राज्यात दिवाळीत गरीब कुटुंबांना मदतवाटपाचे जणू इव्हेंटच साजरे होत आहेत. काही मंत्री व लोकप्रतिनिधींनी कुठे बेड्यावर तर कुठे पोडांवर तर कुठे पालावर जाऊन दिवाळीचे साहित्य गरीबांना वाटले. अन् त्याचे फोटोसेशनही जोरात केले.

भारतात गरीबीचा प्रश्न हा वर्षानुवर्ष सतावतो आहे. काँग्रेसच्या काळात गरीबी हटावोचा नारा दिला गेला. त्यानंतरच्या वेगवेगळ्या पक्षाच्या सरकारनेही गरीबी निर्मूलनासाठी अनेक उपाय योजलेत. मात्र, आजही असंख्य कुटुंब गरिबीच्या कळा सोसत आहेत. असंख्य कुटुंबांची दिवाळी वेदनेत जात आहे. ऐन दिवाळीत कुण्या गरीबाच्या घरी खायलाही दाणा नाही असेही कुटुंब यवतमाळसारख्या जिल्ह्यात आहेत. कुठल्यातरी पालावर, बेड्यावर, पोडावर गरिबीचे हे दाहक वास्तव दिसते. एकीकडे हजारोंचे महागडे कपडे, फटाके, मिष्टान्न अन्नाची रेलचेल तर दुसरीकडे पोटाची भूक भागेल एवढी भाजीभाकरही नशिबी येऊ नये, अशी पराकोटीची विषमता आजही आहे. मुळात यंदाच्या दिवाळीनिमित्ताने काही प्रश्न उभे ठाकले आहेत. अलीकडेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे फोटो कुठल्यातरी गरीब कुटुंबाच्या घरी दिवाळी साजरी करतानाचे म्हणून प्रसिद्ध झाले. तत्पूर्वी कर्मयोगी गाडगेबाबांच्या पदपावलाने पुण्य झालेल्या अमरावती जिल्ह्यात प्रत्येक दिवाळीला तेथील लोकप्रतिनिधींनी किराणा वाटपाची संस्कृती उभी केली. मुळात * पान ४ वर

गरिबी नेमके कुणाचे अपयश ?

देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक दशके लोटली. राजकीय पक्षांनी गरीबी हटाओचे नारे दिले. पूर्वी काँग्रेसने तर आता भाजपाने गरीबी कमी झाल्याचे डंके पिटविले. मात्र, आजही कोट्यवधी लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. दारिद्र्य रेषेच्या वर असंख्य कुटुंबे आलीत असे सांगितले जात असले तरी जमिनीवरचे वास्तव गरिबांना किराणा कीट वाटणाऱ्या राजकीय नेत्यांनी पुढे आणले आहे. विदर्भात आत्महत्याग्रस्त कुटुंबातील सदस्यांच्या डोळ्यातील हतबलता, कोलामपोड अन आदिवासी कुटुंबांसह विमुक्तांच्या जगण्यातील संघर्ष कागदी आकड्यांची पोलखोल करण्यास पुरेसा आहे. गरिबी हे व्यवस्थेचे अपयश असू त्यावर चिंतन केव्हा, हा प्रश्न आहे.

'त्यांना' हवी स्वयंरोजगाराची शिदोरी

दिवाळीत मदतवाटपाच्या इव्हेंटवर आता सखोल चिंतनाची वेळ आली. तात्कालीक स्वरुपाचे किराणावाटप हा काही गरिबीवरील उपाय असू शकत नाही. आज गरज आहे ती अशा शाश्वत धोरणाची की, ज्यामुळे गरिबांना पुन्हा कुणाच्याही दारात मदतीसाठी हात पसरावावा लागणार नाही. गरीबांना स्वावलंबी बनवण्यासाठी मदतीचे धोरण मंत्री व आमदारांनी आखणे गरजेचे आहे. मलमपट्टीचे उपचार नकोत अशा प्रतिक्रिया ही जनतेतून उमटत आहेत. अन् मदतच करायची असेल तर ती इतरांना दाखविण्यासाठी नव्हे असा सूर निघतो आहे.

यच्छंति मूढा : प्रकटीकुर्वन्तिच


एका ग्रंथातील या उपरोक्त श्लोकाचा अर्थ अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. जे लोक दान करून ते जगाला मोठ्याने सांगतात किंवा प्रसिद्धीसाठी त याचा डांगोरा पिटतात ते अज्ञानी अर्थात मूढ आहेत असे या उपनिषदीय श्लोकाचा भाव आहे. दान या हाताचे त्या हाताला ठावूक होऊ नये, अशा पद्धतीने केले जावे असा भारतीय अध्यात्मात आग्रह आहे. जेव्हा दानामध्ये 'अहंकार'किंवा मी देणारा आहे हा भाव निर्माण होतो, आणि जेव्हा त्या दानाचे प्रदर्शन करून वाहवा केली जाते, तेव्हा त्या दानाचा पावित्र भाव नष्ट होतो. ते दान नसून एकप्रकारचा व्यापार किंवा सौदा बनतो. भगवत्गीतेमध्ये सात्विक, राजसिक आणि तामसिक दानाचे वर्णन करताना स्पष्ट म्हटले आहे की, जे दान योग्य वेळी, योग्य पात्राला बदल्यात कोणतीही अपेक्षा न ठेवता केले जाते तेच दान सात्विक दान असते. प्रसिद्धीच्या मोहापोटी दिलेले दान हे राजसिक किंवा तामसिक श्रेणीत जाते.

शेतीच्या जागेवरून वाद

कळंब : शेतीच्या जागेवरून दोन शेतकऱ्यांमध्ये वाद या तिघांनी मिळून शेजारच्या शेतमालकाला मारहाण केल्याची घटना कळंब तालुक्यात येणाऱ्या पिंपळशेंडा येथे काल बारा वाजताच्या दरम्यान घडली. या संदर्भात पोलिसांनी सांगितले की, पिंपळसेंडा येथे सूरज श्रावण चव्हाण (२८) यांचे शेत असून त्या शेताच्या बाजूला आडे परिवाराचे शेत आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यामध्ये शेती जागेच्या हिश्यावरून वाद होत होता. काल याच कारणावरून वाद झाला. सूरज श्रावण चव्हाण हा शेतात आला असता त्याच्यावर शेजारचे शेतमालक भाऊराव परसराम आडे(५२), शेषराव परसराम आडे (६०), पवन शेषराव आडे(३३), निखिल वासुदेव आडे (२८) रा.पिंपळशेंडा यांनी त्याच्यावर हल्ला चढविला. यात चव्हाण यांना काठीने पाठीवर, खांद्यावर,छातीवर, मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच काहींनी लाथा-बुक्क्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर सूरज चव्हाण यांनी कळंब पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली असून पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रिश्टल स्केलवर ३.० तीव्रतेची नोंद
जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर

कळंबच्या एकलासपूरमध्ये भूकंप



■ लोकसूत्र प्रतिनिधी

कळंब : जिल्ह्यात महागावसह उमरखेड तालुक्यात यापूर्वीही भूकंपाचे सौम्य धक्के बसल्याच्या घटना घडल्या. आता कळंब तालुक्यातील एकलासपूर व परिसरात ३.० रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली आहे. या घटनेमुळे स्थानिकांमध्ये काहीकाळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, ह्या भूकंपामुळे कुठलीही जीवित व वित्तहानी झाली नसल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

जिल्ह्यात कळंब तालुक्यातील एकलासपूरमध्ये * पान ४ वर

काय आहे भूगर्भीय पार्श्वभूमी ?


जिल्ह्याचा बहुतांश भूभाग हा डेक्कन ट्रॅप अर्थात दख्खने पठार या प्राचिन आणि ठणक सच्छिद्र बेसॉल्ट खडकाच्या थराने व्यापलेला आहे. ३.० रिश्टर स्केल तीव्रतेचा धक्का अत्यंत सूक्ष्म मानला जातो. या भागातील भुकंपामागे काही भौगोलिक कारणे असतात. मध्य भारतात भुगर्भात अनेक प्राचिन अंतर्गत भ्रंशरेषा आहे. या रेषांमधील साचलेल्या भूगर्भीय ताणामुळे वेळोवेळी सूक्ष्म हालचाली होऊन ऊर्जेचे उत्सर्जन होते. मान्सूनदरम्यान किंवा मान्सूनानंतर भूगर्भातील खडकांच्या भेगांमध्ये पाणी मुरल्यामुळे अंतर्गत खडकांमधील दाब बदलतो. त्यामुळे खडकांच्या थरामध्ये किरकोळ सरक होऊन असे सौम्य धक्के बसतात.














वैभवशाली मराठी भाषेचे दगाबाज कोण?

जपेन वारसा तिचा वाढवेन शान मराठीची बाराखडी म्हणजे अज्ञानी अ म्हणजे अज्ञानापासून सुरू होते आणि ज्ञ म्हणजे माणसाला ज्ञानी करून सोडते. मराठी भाषेतून घेतलेले शिक्षण हे इंग्रजीपेक्षा जास्त प्रभावी आणि परिणामकारक असते. वैभवशाली मराठी भाषेचे दगाबाद अस्सल महाराष्ट्रीयन लोकच आहेत. आपल्या पाल्यांना लहानपणापासून इंग्रजी आलेच पाहिजे.

असा अट्टाहास करणारे भलेही मग मराठी नाही आले तरी चालेल इंग्रजी शाळेतच मुलांना शिकवायचे याकडे बहुतांश मराठी पालकांचा कल असतो. मग इंग्रजीच्या जोडीला शाळेत हिंदी सक्तीच असते. त्यामुळे मग मुलांना हिंदी बोलता आलं पाहिजे म्हणून आई-वडील लहानपणापासूनच मुलांशी हिंदीतच बोलतात. त्यांची भाषा मुळातच मराठी की हिंदी इतपत शंका यावी, असे वातावरण अस्सल महाराष्ट्रीयन लोकांच्या घरात बघायला मिळते. मराठी बोलण्याला सर्रास फाटा दिला जातो. त्या मुलांना पाढेही इंग्रजीत शिकवले जातात, मग ती मुले दुकानात काही वस्तू घेण्यासाठी गेले तर विचारतात काका ६० म्हणजे किती हो. इंग्रजीत सांगा ना! या अशा विचित्र परिस्थितीमुळे खरं तर मुलांचे भविष्य अंधःकारमय झालेले आहे. ते इंग्रजी शिक्षण घेऊन डिग्री जरूर घेतात, पण आपल्या मराठी संस्कारापासून मात्र अलिप्तच राहतात. आपल्या मराठी भाषेच्या पूर्वेतिहास अभिमान वाटावा इतका रोचक, संपन्न आणि वैभवशाली आहे. भविष्यात मात्र मराठी भाषा लोप पावेल की काय, अशी आजची अवस्था निर्माण झाली आहे. मुलांना पारंपरिक सणवाराचे महत्त्व याविषयीही अनास्था निर्माण झाली आहे. कारण पालकांना त्याचे महत्त्व मुलांना सांगणे गरजेचे वाटत नाही. त्याचा पूर्वेतिहास जाणून घेतला तर आजच्या तरुण पिढीला जाणवेल की, अरे आपल्या आई-वडिलांनी आपल्याला मराठीपासून संस्कृतीपासून एवढे दिवस वंचित का ठेवले? मोठमोठ्या शहरात मराठी शाळांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मराठी शाळा जवळ जवळ बंदच झाल्या आहेत. व्यवहारिक इंग्लिश विंग्लीशच्या वाढत्या आक्रमणाला मराठी माणूसच जबाबदार आहे. बोलताना सर्रास इंग्रजी शब्दांचा वापर करण्यात ते स्वतःला धन्यता मानतात गलेलठ्ठ, भारी पगाराची नोकरी मिळावी, यासाठी इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणे यासाठी मुलांपेक्षा पालकांच्या महत्त्वाकांक्षा वाढत चालल्या आहेत. मुलाने कोणते शिक्षण घ्यावे ते आई वडीलच ठरवतात. मग त्यांचे इंग्रजी मजबूत राहण्यासाठी लहानपणापासूनच कोचिंग क्लासेस लावली जातात. स्टँडर्ड ऑफ लिविंगच्या नावाखाली बदलत्या जगाचा विचार आधी करावा लागतो. मोठ्या अधिकाऱ्यांशी बोलताना इंग्रजी आलं पाहिजे म्हणजे म्हणून पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटच्या नावाखाली त्यांना सराईतपणे इंग्रजी बोलता यावे म्हणून लहानपणापासूनच इंग्लिश स्पिकिंगचे क्लासेस लावले जातात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असे आपण पोट तिडकीने सांगतो; परंतु तिचा अस्सल मराठीपणा, श्रृंगार, लावण्य हे टिकवून ठेवण्यास मात्र आपण कुठेतरी कमीच पडतोय.

मी मराठी आहे याचा
वाटे सार्थ अभिमान
लावण्यांचा श्रृंगार
दिसे नऊवारी शोभून
मराठी भाषेचा बाणा
दिसे पोवाडे भारूडातून
मराठीचा गोडवा बघा
जाणवी संस्कारातून
साहित्य विश्वात
मराठीचा ठसा
जपलाय सर्वांनी
लेखणीतून वारसा
मराठी अपुली माय
आपण तिची लेकरं
अमृताहुनी गोड
घाली मायेची पाखर

पाल्यांनी मुलांसाठी प्राथमिक शिक्षण मराठी भाषेत करणे बंधनकारक करणे गरजेचे आहे. किमान घरात मुलांशी मराठीत बोलणं तरी सक्तीच करावे. इंग्रजी माध्यमातील मुलांना धड मराठी वाचता येत नाही आणि हल्लीच्या मुलांना वाचनाचा



कंटाळा आहे. मुलांना पेपर वाचनाची सवय लावायला हवी. मराठी शाळांमध्ये कथाकथन, निबंध स्पर्धा, परिसंवाद घ्यायला हवे. मराठी म्हणी त्यांचे अर्थ आई-वडिलांनी मुलांना समजावून सांगायला हवे. आता मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे तर चांगले प्रभावी मराठी चित्रपट निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने मदत निधी द्यायला हवा. आता ही मराठी भाषीक प्रेमी लोकं आणि कलाकार भरपूर आहेत; परंतु पैशाअभावी दर्जेदार मराठी चित्रपट बनवू शकत नाही. केवळ मराठी भाषादिनाच्या दिवशीच तिची महती गाऊ नका जर आपल्या रक्तातच मराठी भाषा भिनलेली असेल तर तिचा ऱ्हास होणार नाही. मराठी भाषिक आणि तिच्यावर मनापासून प्रेम करणारे खूप आहेत. अशा लोकांनी पुढे येऊन कार्य करावे, यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी पेशांच पाठबळ मिळाले तर ते तर ते त्यांच्या उपजीविकेच तसेच मराठी भाषा प्रचाराच उत्तम आणि प्रभावी माध्यम ठरेल, यात शंकाच नाही. मराठी भाषा जिवंत राहावी असे वाटत असेल तर मुलांना प्रेमाने आणि आपली मातृभाषा म्हणून अभिमानाने तिचे महत्त्व समजून सांगा. त्यांच्याशी मराठीतच बोला. समस्या एवढी गंभीर आहे की मराठी भाषेतून कितीतरी मराठी शब्द व्यवहारातून लोप पावत चालले आहे. आपण मराठीत एखाद्या पर्यायी शब्द वापरला तर मुलं म्हणतात की या शब्दाचा अर्थ काय आहे? पारंपरिक पूर्वापार चालत आलेली आपली मराठी भाषा व्यवहारात लुप्त होत चालली आहे. मुलांना जुने मराठी चित्रपट आवर्जून बघायला लावले पाहिजे. त्यातून सणवार, परंपरा आणि महाराष्ट्रीय संस्कृती यांचे दर्शन होते. हल्ली वाचन संस्कृती जवळपास संपुष्टात आली आहे. प्रत्येक गावात वाचनालय असावे आणि लहान मुलांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून वाचनालयात त्यांना चॉकलेट, बिस्कीट, फराळ भेटवस्तू असे जर दिल्या गेले आणि काही आवडीचे खेळ असतील तर ती आवडीने वाचनालयात एका जागी बसून ज्ञानग्रहण करतील.आपल्या मराठी संस्कृतीमध्ये कितीतरी महान कवी, संत, विद्वान होऊन गेले कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस २७ फेब्रु. हा मराठी भाषा गौरवदिन माणूस साजरा केला जातो. मराठी ही राजभाषा आहे. इतिहास गाजवणारे शूरवीर राजे छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज तसेच शौर्याची गाथा गाजवणाऱ्या अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी यांचे आदर्श आपण डोळ्यासमोर ठेवून मुलांना त्यांची माहिती सांगायला हवी. मराठी भाषा खरच खूप गोड, सुंदर कर्णमधुर आहे. अलंकारिक अशी भाषा एका शब्दाचे दोन अर्थ निघतात, तेव्हा व्यंगात्मक बोलले तर त्याचा राग मानत नाहीत . अभिमान आहे मला माझ्या भाषेवर, कर्तृत्वावर. अभिमान आहे मॉ. जिजाऊ अन राजे शिवबावर ज्यांनी काळोख्या रात्री स्वतःचे रक्त सांडून त्यांना उजेडात परावर्तीत केले. आपले प्राण धोक्यात घालूनही दांडगी अस्मिता जपली आणि त्यांनी आपल्याला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करून स्वातंत्र्याची सुंदर सकाळ दाख वली. धुर्त इंग्रजांच्या तावडीतून सुटका करून या महाराष्ट्राच्या मातीने आपणास माणूस बनवले. असे आमुची मायबोली मराठी. जगण्याचा ध्यास, प्रेमळ सहवास, एक बलदंड विश्वास एक मराठी माणूस म्हणून करू मराठी भाषेचा सन्मान. राकट मराठीचा अभिमान आणि मराठी भाषेचा करु प्रचार आणि प्रसार. मराठी शब्दात मराठी मातीचा गंध लपलेला आहे. इतिहासाच्या पानोपानी संस्कार आणि नीतीमत्ता व जोपालेली आहे. अंतकरणात खोलवर रूजलेली . काळ कितीही बदलला तरी मराठी माणूस कधीही न बदलणारा. जगतांना प्रत्येक श्वासागणिक मुरलेली अशी आपली मराठी भाषा म्हणजे अभिजाततेची तेजस्वी गाथा आणि मराठी मातीशी नाळ जोडलेली अशी संतांनी जपलेली आणि मोठमोठया कवींनी त्यात प्राण ओतलेली. तिची अस्मिता आपण आमरण जपूया . मराठी भाषेचा दर्जा टिकावा यासाठीदोन उपाय...

१) आताच्या विद्यार्थ्यांना वाचनाचा भयंकर कंटाळा आहे. तर मुलांना रुची वाटतील असे दर्जेदार मराठी साहित्याचे आणि संस्कृतीचे डिजिटल स्वरूपात रुपांतर केले तर मुलांना ते बघण्यासाठी प्रोत्साहित करायला हव. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला ही अभिमानाची गोष्ट आहे हे नव्या पिढीला पटवून द्यावे .

२) तरुण लेखक/कवी यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे . अभिजात मराठी संशोधनासाठी इच्छुक अशा तरुणांना स्वतंत्र संस्था आणि रोजगार उपलब्ध करून द्यावा आणि प्रत्येक शाळेत त्यांची भाषणं ठेवावी. नाटक, चित्रपट, भारुड अभंग, पोवाडे यांचे आधुनिक संगीतावर आधारित सादरीकरण वरचेवर शाळा, कॉलेज आणि सांस्कृतिक कार्य क्रमात व्हायला हवे. दूरदर्शन, आकाशवाणीवर दर्जेदार मराठी कार्यक्रम घ्यायला हवे. अशा उपक्रमातून आपण आपली माय मराठीची महती जपायला हवी.

सौ .प्रिया पदमाकर डाखोडे / इंदाणे (प्रियदर्शिका) यवतमाळ

भाऊबीज : नात्यातील प्रेमाचा गोडवा जपणारा सण

औक्षणाच्या ताटातील दिव्याची ज्योत, कपाळावरील कुंकवाचा टिळा आणि भावाच्या हातातील प्रेमाची भेट... भाऊबीज म्हणजे केवळ एक सण नाही, तर भाऊ-बहिणीच्या नात्यातील जिव्हाळा, माया आणि आयुष्यभराच्या विश्वासाचा सुंदर सोहळा आहे. काळ बदलला, जीवनशैली बदलली, माणसांच्या राहणीमानात आधुनिकता आली; मात्र भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेमाची ऊब आजही तशीच कायम आहे. दिवाळीच्या मंगलमय पर्वातील भाऊबीज हा दिवस या नात्याला नव्याने उजाळा देणारा आणि जुन्या आठवणींना उजाळा देणारा असतो.

भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सणामागे काहीतरी विशेष परंपरा, श्रद्धा आणि जीवनमूल्य दडलेले आहे. भाऊबीज हा त्याच परंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहे. कार्तिक शुद्ध द्वितीयेला भाऊबीज साजरी केली जाते. या दिवशी बहीण आपल्या भावाला घरी बोलावून त्याचे औक्षण करते, कपाळावर कुंकवाचा टिळा लावते आणि त्याच्या दीर्घायुष्याची, सुखसमृद्धीची प्रार्थना करते. भाऊही बहिणीला भेटवस्तू देऊन तिच्या सुखाची आणि सुरक्षिततेची काळजी घेण्याचे आश्वासन देतो. या छोट्याशा विधीमध्ये नात्यातील मोठा भावनिक अर्थ सामावलेला आहे.

भाऊबीजेच्या परंपरेमागे यम आणि यमुना यांची पौराणिक कथा सांगितली जाते. सूर्यदेवाची कन्या यमुना हिने आपला भाऊ यमराज याला घरी भोजनासाठी आमंत्रित केले होते. यमराज बहिणीच्या घरी आले असता यमुनेने त्यांचे औक्षण करून प्रेमाने भोजन दिले. बहिणीच्या प्रेमाने प्रसन्न झालेल्या यमराजांनी तिला वर मागण्यास सांगितले. त्यावेळी यमुनेने या दिवशी जो भाऊ आपल्या बहिणीच्या घरी जाऊन तिच्याकडून औक्षण करून घेईल, त्याला दीर्घायुष्य आणि सुख लाभावे, अशी इच्छा व्यक्त केली. तेव्हापासून भाऊबीजेची परंपरा सुरू झाल्याचे मानले जाते.

महाराष्ट्रात भाऊबीजेचा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दिवाळीच्या इतर दिवसांप्रमाणेच या दिवशीही घराघरांत आनंदाचे वातावरण असते. बहिणी आपल्या भावाच्या स्वागतासाठी घराची स्वच्छता करतात. अंगणात सुंदर रांगोळी काढली जाते. औक्षणाचे ताट सजविले जाते. त्यात दिवा, कुंकू, अक्षता, फुले आणि मिठाई ठेवली जाते. भाऊ घरी आल्यानंतर त्याला पाटावर बसवून बहिण त्याचे औक्षण करते. त्याच्या कपाळावर टिळा लावून त्याला ओवाळते. त्यानंतर गोडधोड भोजनाचा आस्वाद घेतला जातो. या प्रसंगी भावंडांमधील जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. लहानपणी भाऊ-बहिणीमध्ये कितीही भांडणे झाली, एकमेकांची चिडवाचिडवी झाली, तरी संकटाच्या वेळी एकमेकांच्या पाठीशी उभे राहणारे हे नाते असते. बालपणी एकाच घरात वाढताना खेळणी, खाऊ, कपडे यावरून होणारी भांडणे पुढे आयुष्यभराच्या आठवणी बनतात. बहिणीने भावाला राखलेली राखी असो किंवा भावाने बहिणीच्या डोक्यावर ठेवलेला मायेचा हात असो, या नात्यातील प्रत्येक कृती प्रेमाची साक्ष देत असते. भाऊ कितीही मोठा झाला, कितीही यशस्वी झाला, तरी बहिणीसाठी तो लहानपणीचा खोडकर भाऊच असतो. तसेच बहीण कितीही मोठी झाली, तरी भावासाठी ती लाडकी बहिणच असते. आजच्या बदलत्या काळात शिक्षण, नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने अनेक भावंडे वेगवेगळ्या शहरांत किंवा परदेशात स्थायिक झाली आहेत. एकाच घरात राहणारी भावंडे आता वर्षातून एखाद-दुसऱ्या वेळीच भेटतात. मोबाईल, व्हिडिओ कॉल आणि सोशल मीडियामुळे संपर्क साधणे सोपे झाले असले, तरी प्रत्यक्ष भेटीतील आनंद वेगळाच असतो. भाऊबीजेच्या निमित्ताने बहिणीच्या घरी जाणे, तिच्या हातचे जेवण खाणे आणि काही क्षण एकत्र घालवणे याला कोणत्याही महागड्या भेटवस्तूची सर येऊ शकत नाही. भाऊबीज ही केवळ भेटवस्तू देण्याची परंपरा नाही. या दिवशी भावाने बहिणीच्या भावना समजून घेणे, तिच्या अडचणी जाणून घेणे आणि तिच्या आयुष्यातील प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर तिला आधार देणे अधिक महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे बहिणीनेही भावाच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्याला मानसिक बळ देणे आवश्यक आहे. नात्यांमध्ये केवळ औपचारिकता न ठेवता संवाद, विश्वास आणि समजूतदारपणा टिकवून ठेवणे गरजेचे आहे. आज समाजात मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव कमी करण्याची गरज आहे. बहिणीच्या शिक्षणाला, करिअरला आणि स्वप्नांना प्रोत्साहन देणे हीदेखील भावाची महत्त्वाची जबाबदारी आहे. बहिणीच्या आयुष्यातील निर्णयांचा आदर करणे आणि तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्साहित करणे, हीच तिच्याप्रती असलेल्या प्रेमाची खरी ओळख आहे. भाऊबीजेचा सण अशा सकारात्मक विचारांना बळ देणारा ठरला पाहिजे. या दिवशी अनेक ठिकाणी बहिणी भावाला आवडीचे पदार्थ बनवून खाऊ घालतात. पुरणपोळी, श्रीखंड, लाडू, करंजी आणि विविध दिवाळी फराळाच्या पदार्थांनी ताट सजते. भावाकडून मिळणारी भेटवस्तू बहिणीसाठी आनंदाची बाब असते; मात्र तिच्यासाठी भावाने वेळ काढून घरी येणे, प्रेमाने दोन शब्द बोलणे आणि तिच्या सुखदुःखात सहभागी होणे हीच सर्वांत मोठी भेट असते. काळाच्या ओघात अनेक परंपरा बदलत असल्या, तरी भाऊबीजेच्या सणामागील भावना कधीही बदलता कामा नये. केवळ दिवाळीच्या एका दिवसापुरते भावंडांचे प्रेम मर्यादित न राहता वर्षातील प्रत्येक दिवशी ते जपले गेले पाहिजे. मतभेद झाले तरी मनभेद होऊ नयेत. संपत्ती, पैसा, मालमत्ता किंवा कौटुंबिक कारणांमुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होऊ नये. कारण आयुष्याच्या प्रत्येक वळणावर रक्ताच्या नात्यांचा आधार माणसाला मानसिक बळ देत असतो. खरं तर भाऊबीज म्हणजे बहिणीच्या मायेचा आणि भावाच्या विश्वासाचा उत्सव आहे. बहिणीच्या औक्षणातील प्रत्येक दिवा भावाच्या आयुष्यातील संकटे दूर व्हावीत, अशी सदिच्छा व्यक्त करतो. तर भावाने दिलेली भेट तिच्या चेहऱ्यावर आनंद फुलवते. या नात्यातील प्रेमाला कोणतेही मोल नाही आणि त्याची तुलना कोणत्याही संपत्तीशी होऊ शकत नाही. चला तर मग, यंदाच्या भाऊबीजेला केवळ भेटवस्तूंची देवाणघेवाण न करता नात्यांमधील प्रेम, विश्वास आणि आपुलकी अधिक घट्ट करूया. दूर गेलेल्या भावंडांना जवळ आणूया, जुन्या आठवणींना उजाळा देऊया आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा संकल्प करूया. कारण आयुष्यात अनेक नाती जोडली जातात; पण भाऊ-बहिणीचे नाते हे जन्माने मिळालेले आणि प्रेमाने आयुष्यभर जपायचे असते. भाऊबीजेच्या मंगलमय पर्वात प्रत्येक बहिणीच्या चेहऱ्यावर आनंद फुलो आणि प्रत्येक भावाच्या आयुष्यात सुख, आरोग्य व समृद्धी नांदो. भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेमाचा हा स्नेहबंध असाच जन्मोजन्मी टिकून राहो!

बिरसा मुंडा : क्रांतिकारी योध्दा

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर रोजी 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरा केला जात आहे. तसेच भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर क्रांतिकारी लढवय्या भगवान बिरसा मुंडा यांचे जीवनकार्य आणि त्यांच्या इतिहासातील कार्याविषयीची ही माहिती...देशभरातील जनतेमध्ये आणि आदिवासींमध्ये भगवान म्हणून बिरसा मुंडा यांची पूजा केली जाते. आदिवासी विकास आणि आदिवासींच्या हक्कांसाठी लढणारे लढवय्ये म्हणून त्यांना आपण सर्वजण ओळखतो. त्यांनी अल्प कालावधीत केलेल्या देशसेवा आणि अत्यंत उल्लेखनीय योगदानाबद्दल ते देशवासियांच्या कायम स्मरणात आहेत.

बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंड राज्यातील तत्कालीन रांची आणि आजच्या खुंटी जिल्ह्यातील उलिहातू गावात आदिवासी कुटुंबात झाला. बिरसांच्या वडिलांचे नाव सुगना मुंडा आणि आईचे नाव कर्मी मुंडा होते. बिरसा मुंडा यांचे प्राथमिक शिक्षण मिशनरी शाळेत झाले. त्या काळात इंग्रजांकडून भारतीयांवर अत्याचार करण्यात येत होते. हे पाहून त्यांनी शालेय जीवनापासून इंग्रज सरकार विरोधात लढा उभारण्याचा निश्चय केला. हक्कासाठी क्रांतिकारक लढावयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी, सध्याच्या झारखंडमधील उलिहातू गावातील बिरसा, हा तरूण मुलगा वसाहतवादी शोषणाविरुद्ध मोठ्या प्रमाणात प्रतिकार करणारा नायक बनला. जेव्हा ब्रिटीश अधिकारी आणि स्थानिक जमीनदार शोषण करीत होते, त्यांच्या जमिनी बळकावत होते आणि आदिवासी समुदायांवर अत्याचार करीत होते, तेव्हा भगवान बिरसा यांनी या सामाजिक आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध आवाज उठविला आणि लोकांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी प्रेरित केले. 'धरती आबा' म्हणून आदरणीय असलेल्या भगवान बिरसा यांनी १८९० च्या दशकाच्या उत्तरार्धात ब्रिटीश दडपशाहीविरुद्ध 'उलगुलान' किंवा मुंडा बंडाचे नेतृत्व केले. इंग्रजांचा जनतेवरील अन्याय सहन न झाल्याने त्यांनी आयुष्यभर इंग्रजांविरोधात संघर्ष केला. उलगुलान हा निःसंशयपणे बंडखोरीपेक्षा अधिक तीव्र होता. ही लढाई न्याय आणि सांस्कृतिक ओळख या दोन्हींसाठी होती. बिरसा मुंडा यांच्या पुढाकारामुळे एकीकडे आदिवासींना कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय त्यांच्या जमिनीवर मालकी मिळवण्याचा आणि शेती करण्याचा अधिकार मिळाला आणि दुसरीकडे आदिवासी चालीरीती आणि सामाजिक मूल्यांचे महत्त्व देखील एकत्र आणले. महात्मा गांधींप्रमाणेच त्यांचा संघर्षही न्याय आणि सत्याच्या शोधातून प्रेरित होता. आजारी लोकांची सेवा करणे हे बिरसा यांचे ध्येय होते. त्यांनी औषधोपचार करण्याचे प्रशिक्षण घेतले होते. यशस्वी उपचाराच्या अनेक घटनांनी लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला होता. त्यांनी लोकांना विनंती केली की, कोणत्याही आजारी व्यक्तीला त्यांच्याकडे घेऊन या, जर हे शक्य नसेल तर मी स्वतः आजारी लोकांना भेटायला येईन. ते गावोगावी जाऊन आजारी लोकांना भेटत असत आणि आपल्या कौशल्याने आणि आपल्या उपचाराने असंख्य लोकांना बरे करीत असत. दुष्काळ आणि महामारी आल्यानंतर जनतेचे प्रचंड हाल झाले. अशा काळात बिरसा मुंडा यांनी जनतेची खूप सेवा केली. दोन वर्षे तुरुंगवास एकीकडे जनतेचे हाल होत होते, दुसरीकडे इंग्रजांचा जुलूम अशा स्थितीत बिरसा यांनी जनतेवरील कर माफीसाठी इंग्रजांविरुद्ध थेट आंदोलन सुरू केले. बिरसांची वाढती लोकप्रियता इंग्रजाच्या डोळ्यात खुपत होती. त्यांनी दडपशाहीचा वापर करून १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना अटक करून हजारीबाग तुरुंगात पाठवले. बिरसा मुंडा येथील तुरुंगात सुमारे दोन वर्षे बंदिस्त राहिले. पुढे १८९७ ते १९०० या काळात ब्रिटिश आणि मुंडा यांच्यात अनेक वेळा युद्धे झाली. बिरसा मुंडा आणि इंग्रज यांच्यात खुंटी येथे ऑगस्ट १८९७ मध्ये युद्ध झाले, बिरसा मुंडा आणि त्यांच्या सुमारे ४०० सहकाऱ्यांनी अत्यंत धैर्य दाखवित धनुष्यबाणांसह खुंटी पोलीस स्टेशनवर हल्ला केला. १८९८ मध्ये टांगा नदीच्या काठावर मुंडांसह त्यांचे सहकारी आणि इंग्रज यांच्यात प्रचंड संघर्ष झाला. या लढाईत इंग्रज सैन्याचा मानहानीकारक पराभव झाला. परंतु इंग्रजांनी वचपा काढण्याकरिता अनेक आदिवासी नेत्यांना अटक करीत कारवाई करण्यास सुरुवात केली. यानंतर १९०० साली डोंबाडी टेकडीवर दुसरे युद्ध झाले. या लढ्यात अनेक महिलांसह निष्पाप अशा लहान मुलांचा मृत्यू झाला. रांचीमध्ये घेतला अखेरचा श्वास बिरसा मुंडा यांनी युद्ध करून इंग्रजांना जेरीस आणले होते. त्यामुळे फेब्रुवारी १९०० मध्ये इंग्रजांनी बिरसा मुंडा यांना चक्रधरपूर येथून अटक करून रांची तुरुंगात डांबले. येथेच ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडा यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा मृत्यू कॉलरामुळे झाल्याचे इंग्रज सरकारने सांगितले. मात्र, त्यावेळी कॉलराची कोणतीही लक्षणे दिसली नसल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. वयाच्या २५ व्या वर्षी मुंडा यांचा मृत्यू झाला. भगवान बिरसा मुंडा यांनी दाखवलेल्या मार्गावर



चालणाऱ्याला 'बिरसाईच' म्हणतात. आजही त्यांचे अनुयायी त्यांनी सांगितलेल्या विचारधारेप्रमाणे चालतात. बिरसा मुंडा यांनी संपूर्ण जीवन आदिवासी समाजाच्या विकासाकरीता वाहून घेतले होते. अत्याचाराविरोधात आक्रमकपणे लढा देताना त्यांनी इंग्रजांच्या अत्याचाराविरुद्ध बिगुल फुंकले. बिरसा मुंडा हे पुरोगामी विचारवंत आणि सुधारणावादी नेते होते. त्यांनी आदिवासी समाजाला अंधश्रद्धा आणि अंमली पदार्थांच्या व्यसनाच्या विरोधात जागरूक केले. प्राण्यांना मारणे योग्य नाही, त्यांचा बळी देणे चुकीचे आहे, असे त्यांचे मत होते. पशू-पक्षी यांच्याबाबत सहानुभूती असली पाहिजे, असे सांगून त्यांनी आदिवासींना दारू पिण्यास विरोध केला. बिरसा मुंडा यांनी समस्त आदिवासींचे संघटन करण्यावर भर दिला. झारखंड व्यतिरिक्त बिहार, ओडिशा, छत्तीसगड आणि पश्चिम बंगालच्या आदिवासी भागातही बिरसा मुंडा यांची पूजा केली जाते. रांची येथील कोकर येथे बिरसा मुंडा यांची समाधी आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने 'बिरसाईच' लोक, अनुयायी त्यांना आदरांजली वाहण्यासाठी तिथे जातात. गौरव दिवस होणार साजरा भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या जल, जंगल, जमीन आणि पारंपरिक हक्कांच्या संरक्षणासाठी केलेल्या संघर्षाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिन' म्हणून घोषित केला आहे. आदिवासी स्वातंत्र्यवीरांचे योगदान, संस्कृती, परंपरा, इतिहास, भाषा आणि अस्मिता यांचे जतन व संवर्धन करून हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. बिरसा मुंडा यांच्या वारशाचे स्मरण करण्याचे उद्दिष्ट दीर्घकाळ दुर्लक्षित असलेल्या आदिवासी इतिहासाला भारताच्या इतिहासाच्या केंद्रस्थानी ठेवणे हे आहे. आदिवासी समाजाच्या अमूल्य योगदानाची ओळख होण्यासाठी हा दिवस देशभरात साजरा केला जातो. आदिवासी समाजाने क्रांतिकारी चळवळीतून इंग्रजाशी संघर्ष करताना सर्वोच्च बलिदान दिले. इंग्रजांच्या राजवटीविरुद्ध देशातील अनेक आदिवासी चळवळी राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यात सामील झाल्या होत्या. त्यांनी देशभरातील भारतीयांना प्रेरित केले आहे. राज्यभर विशेष कार्यक्रम भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे, विविध शासकीय सेवांचा लाभ सुलभ करणे तसेच त्यांचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक सक्षमीकरण करण्यावर तसेच पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ, सेवा वितरणावर विशेष भर देण्यात येणार आहे. भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील गडचिरोली येथे देशस्तरावरील मुख्य शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त राज्यातील सर्व जिल्हा आणि अनुसूचित जमातीबहुल तालुका मुख्यालयांमध्ये भगवान बिरसा मुंडा तसेच अन्य आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात येणार आहे. पद्म पुरस्कारप्राप्त आदिवासी व्यक्ती, सामाजिक नायक, समाजसेवक, बुद्धिजीवी, आदिवासी संत-महंत तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व समूहांचा सन्मान करण्यात येणार आहे. आदिवासी महापुरुषांच्या नावाने उद्याने, चौक आणि रस्त्यांचे नामकरण तसेच ऐतिहासिक वारशाच्या जतनाचे उपक्रमही राबविण्यात येतील. इतिहासातील भगवान बिरसा मुंडा आणि इतर अशा काही व्यक्तिमत्वांची नावे माहित नसायची. अलीकडच्या काळात मातृभूमीसाठी त्यांच्या शौर्याचे आणि बलिदानाचे अधिकाधिक लोकांकडून कौतुक केले जात आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव काळात आपल्या संस्कृतीच्या आणि उपलब्धीच्या गौरवशाली इतिहासाची उजळणी साजरी केली गेली. यामुळे देशवासियांना, विशेषत: तरुण पिढीला, अशा महान देशभक्तांच्या शौर्यपूर्ण योगदानाची जाणीव झाली. त्यामुळे भगवान बिरसा मुंडा यांच्या शौर्य आणि पराक्रमी नेतृत्वाची आठवण आजच्या नवीन पिढीला सदैव प्रेरणा देत राहील यात शंका नाही.

अनिल आलुरकर
उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.

टिप : या लेखांमध्ये प्रकाशित होणारी मते लेखकांची आहे. त्याच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

थोडक्यात

मानव सेवा सामाजिक संस्थांचे दीपावली मिलन

यवतमाळ : दीपावली हा आनंदाचा, प्रकाशाचा उत्सव आहे. ती साजरी करण्याची स्थिती ज्यांची नसते, त्यांच्यासाठी ऐनदिवाळीत शिधावाटप करण्याची कल्पना स्तुत्य आहे. ती प्रत्यक्षात आणणाऱ्या यवतमाळातील सेवाभावी सामाजिक संस्था व त्या माध्यमातून निःस्वार्थपणे काम करणारांची संख्या पाहता इथे मानवसेनेची पंढरी अवतरल्याचे चित्र पाहायला मिळते, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी येथे केले. मानव सेवा सामाजिक संस्थांच्या दीपावली मिलनप्रसंगी ते बोलत होते. येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील बळीराजा चेतना बचत भवनात आयोजित कार्यक्रमाच्या व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते सुरेश राठी, अनंत कौलगीकर, राजेश गढीकर, डॉ. नारायण मेहरे, प्रशांत बनगीनवार उपस्थित होते. याप्रसंगी नंददीप फाउंडेशन, सेवा समर्पण, ओवी ट्रस्ट, संकल्प फाउंडेशन, तेजस्विनी छात्रावास, नवजीवन वृद्धाश्रम नेर, संत दोला महाराज वृद्धाश्रम उमरी पठार, स्व.स.अ. भूत वृद्धाश्रम यवतमाळ, जिव्हाळ्याची भिंत संस्था घाटंजी, मातोश्री वृद्धाश्रम आर्णी, स्नेह आधार, नेर या संस्थांना गहू, तांदूळ, दाळ व तेल इ. वस्तूंचे मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सुरेश राठी यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन विवेक कवठेकर तर आभार अनंत कौलगीकर यांनी मानले.

एचडीएफसी बँकेकडून निधी उपलब्ध

यवतमाळ : जिल्ह्याच्या सर्वांगीण, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी मृदा व जलसंधारण विभागाच्या पुढाकाराने जिल्हा प्रशासन आणि वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट डब्ल्यूओटीआर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या सहकार्यांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध विकास प्रकल्पांसाठी एचडीएफसी बँकेमार्फत निधी उपलब्ध करून दिला जाणार असून, या प्रकल्पांची अंमलबजावणी वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या माध्यमातून केली जाणार आहे. यावेळी जिल्हा मृदा व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रफुल खिराडे तसेच एचडीएफसी बँकेचे पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत जल व मृदासंधारण, एकात्मिक पाणलोट विकास, नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन, हवामान बदलास अनुकूल शेती,उपजीविका आणि स्थानिक संस्थांचे बळकटीकरण यावर विशेष भर दिला जाणार आहे. लोकसहभागातून विकासाला चालना ग्रामस्तरावरील संस्थाची क्षमता वाढविणे, जल व नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, हवामानपूरक शेतीपद्धतीचा प्रसार आणि शाश्वत उपजीविकेच्या संधी बळकट करण्यासाठी स्थानिक समुदायांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे. जिल्हा प्रशासनाचा समन्वय, एचडीएफसी बँकेचे आर्थिक सहकार्य आणि वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टचे तांत्रिक ज्ञान व प्रकल्प अंमलबजावणीचा अनुभव यांच्या समन्वयातून जिल्ह्यात शाश्वत विकासाच्या विविध उपक्रमांना चालना देणे हा या सामंजस्य कराराचा मुख्य उद्देश आहे.

आदिवासी शबरी घरकूल योजनेसाठी ४ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

यवतमाळ : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा अंतर्गत नगरपरिषद यवतमाळ तसेच नगरपंचायत बाभूळगाव, राळेगाव व कळंब येथे सन २०२५-२६ या वर्षासाठी आदिवासी शबरी घरकुल योजना (शहरी) या योजनेंतर्गत निर्धारित लक्षांक पूर्ण न झाल्याने पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज व प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी आपले अर्ज एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा किंवा संबंधित नगरपरिषद व नगरपंचायत कार्यालयात सादर करावेत. अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत ४ डिसेंबर आहे. नगरपरिषद व नगरपंचायतनिहाय आवश्यक अर्जांची संख्या, यवतमाळ नगरपरिषदेसाठी १५९, बाभूळगाव नगरपंचायतीसाठी १८, राळेगाव नगरपंचायतीसाठी १ आणि कळंब नगरपंचायतीसाठी १ अर्ज आवश्यक आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक पात्र लाभार्थ्याला २ लाख ५० हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. योजनेच्या पात्रतेच्या अटी लाभार्थ्याचे वय किमान १८ वर्षे असावे, अर्जदार अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक आहे, अर्जदाराच्या स्वतःच्या नावावर पक्के घर नसावे, घर बांधकामासाठी स्वतःची किंवा शासनाकडून उपलब्ध करून दिलेली जमीन असावी, लाभार्थी महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षांपासून रहिवासी असावा, यापूर्वी कोणत्याही शासकीय घरकूल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, घरकुलाचे बांधकाम क्षेत्र २६९ चौरस फूट राहील, तसेच अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपर्यंत असावे आणि स्वतःच्या नावाने आधार संलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अलीकडील दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, रहिवासी प्रमाणपत्र, अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र, घरकूल बांधकामासाठी जागा उपलब्ध असल्याचा पुरावा, तहसीलदारांचा उत्पन्नाचा दाखला, शिधापत्रिका, आधार कार्ड तसेच बँक खात्याच्या रद्द केलेल्या धनादेशाची किंवा बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. बँक खात्यावरील छायाचित्र व खाते क्रमांक स्पष्ट दिसणे आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन साहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी रेवैयाह डोंगरे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांनी केले आहे.

शेतकरी, निराधार, मुलांसोबत दिवाळी साजरी

यवतमाळ : दिवाळी हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण असून यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी पुसद तालुक्यातील गौळ मांजरी, चिलवाडी, भगतवाडी आणि श्रीरामपूर येथे सहपत्नीक उपस्थित राहून शेतकरी कुटुंब, निराधार मुलांसोबत उत्साहात दिवाळी साजरी केली. यावेळी एल निनोच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीवर राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा केली. शेतकऱ्यांच्या अडचणी, गावातील विविध समस्या आणि संभाव्य उपाययोजनांबाबत संवाद साधत संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची ग्वाही त्यांनी दिली. गावातील निरागस बालकांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करताना फटाके फोडून तसेच फटाक्यांचे वाटप करून त्यांच्या आनंदात भर घातली. गावातील ज्येष्ठ नागरिकांना दिवाळीनिमित्त ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. तसेच राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि पुसदच्या नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांच्या हस्ते शेतकऱ्यांना दिवाळीची भेट म्हणून विविध गोड पदार्थांसह 'आनंदाचा शिधा', दिवाळी फराळ वितरित करण्यात आला. ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि त्यांच्या मनातील समाधान हीच खरी दिवाळी साजरी केल्याची अनुभूती असल्याची भावना राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी व्यक्त केली. याप्रसंगी ग्रामस्थांसोबत विविध विषयांवर संवाद साधत त्यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि बालकांसोबत स्नेहपूर्ण वातावरणात साजऱ्या झालेल्या या दिवाळी सोहळ्याने गावात आनंद आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

स्थानिक निधीच्या ऑडिटमध्ये अपहाराचे उच्चांक, १५ व्या वित्त आयोगाच्या निधीत अनागोंदी

दारव्हात ग्रामविकास योजनांचा बट्ट्याबोळ

केशव सवळकर

यवतमाळ : ग्राम विकास विभागाच्या असंख्य योजना ग्रामपंचायतीमार्फत राबविल्या जातात. मात्र, दारव्हा पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये १५ व्या वित्त आयोगासह व्हीबी-जी राम-जी या रोहयो व वैयक्तिक लाभांच्या योजनांमध्ये प्रचंड अनागोंदी आहे. स्वच्छता मिशनसह घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन व इतरही योजनांची गुणात्मक स्थिती गंभीर असून कागदोपत्री योजना उत्तम असल्या तरी ग्राऊंडवरील फलश्रुती नगण्य आहे.

दारव्हा पंचायत समिती पालकमंत्री संजय राठोड यांच्या मतदारसंघातील आहे. त्यामुळे या पंचायत समितीला प्राप्त होणारा निधीचा ओघही मोठा आहे. ग्रामपंचायतींना यापूर्वी १५ व्या वित्त आयोगाचा प्रचंड निधी मिळाला. निधीवाटप धोरणात ग्रामपंचायती ७० टक्के, पंचायत समिती व जिल्हा परिषद प्रत्येकी १० टक्के असे निधीवाटपाचे धोरण होते. दरम्यानच्या काळात ग्रामपंचायतींनी जलशुद्धीकरण यंत्रांसह गावात पथदिवे, कचराकुंड्यांच्या नावाखाली प्रचंड निधी खर्च केला. आज रोजी अनेक गावातील जलशुद्धीकरण यंत्र कूचकामी पडले आहेत. कचराकुंड्याही कचऱ्यात आहेत. मुख्यमंत्री ग्रामसमृद्ध पंचायतराज अभियानाची अवस्था बिकट आहे. सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या योजनांमध्ये घोळ आहेत. ओला व सुका कचऱ्याचे कुठलेही व्यवस्थापन नाही. प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी पंचायत समितीच्या स्तरावर प्लास्टिकची बारीक तुकडे करणारी मशीन बसवायच्या होत्या. मात्र, त्या कुठेही दिसत नाहीत. शोषखड्डे, मॅजिक शीट, बंदिस्त गटारे अशा सर्व कामांमध्ये गैरप्रकार झालेत. मुळात स्थानिक निधी लेखा विभागाकडून होणाऱ्या ऑडिटदरम्यान ग्रामसेवक आपले अभिलेखेच उपलब्ध


संग्रहित

प्लससारख्या हागणदारीमुक्त अधिकचा किती गावाला मिळाला, हा प्रश्न आहे.

दौरा दैनंदिनीकडेच अधिकाऱ्यांची पाठ पंचायत समितीच्या बीडीओंसह विस्तार

विस्तार अधिकाऱ्यांसह ग्रामसेवकांची व्यापक चौकशी हवी

तसा शासन निर्णय आहे. मात्र दारव्हाच्या बीडीओंसह विस्तार अधिकाऱ्यांचे दौरे व मुक्काम किती, हा प्रश्न आहे. विस्तार अधिकारी दप्तरांची तपासणी ग्रामपंचायतीमध्ये जाऊन किती पारदर्शीपणे करतात, हाच प्रश्न आहे.

घरकूल योजनांचा परफॉर्मन्स बिकट अनेक ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण या योजनेसह अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गासाठीच्या रमाई आवास व मोदी आवास योजनेची अवस्था बिकट आहे. अनेक घरकुले अर्धवट आहेत. राजकीय हस्तक्षेप प्रत्येक योजनेमध्ये आहेत. टक्कासंस्कृती प्रत्येक कामात वाढली आहे. एकंदरीत स्थानिक निधी लेखा विभागाने या तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतींचे स्वतंत्र ऑडिट करावे व गत पाच वर्षातील योजनांवरही फोकस करावा अशी अपेक्षा आहे.

जनसेवा फाउंडेशनचा 'एक दिवा' निराधाराचा

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : येथील स्थानिक जनसेवा फाउंडेशन मुलकी यांनी प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही दिवाळी हा सण निराधार, गोरगरिबांसोबत मोठ्या उत्साहात साजरा केला. दीपावलीचा पहिला दिवस म्हणजे वसुबारस या दिवशी अमरावती जिल्ह्यातील परतवाडा, कांडली,अचलपूर या परिसरातील झोपडपट्टीत राहणारे, अतिदुर्गम भागातील आदिवासी पाडा, सेवा वस्ती इत्यादी भागात जाऊन अध्यक्ष रामचंद्र ढोबळे तसेच सहयोगी संचालक रवी दादा गोबाडे, संस्थेच्या प्रसिद्धीप्रमुख डॉ.



मीनाक्षी खत्री, जान्हवी गोबाडे यांनी महिलांना साडी-चोळी वाटप, बालकांना मिठाई वाटप, दिवाळीचा प्रसाद, रांगोळी, पणती आदी वस्तूंचे वितरण करण्यात आले. जनसेवा फाउंडेशन ही संस्था विधवा, निराधार महिलांसाठी कार्य करीत आजवर ७५ पेक्षा अधिक गरजू महिलांना व्यवसाय लावून दिला आहे. समाजाला आपलेही काही देणं लागते या विचारावर मार्गक्रमण करीत संस्थेने आजवर अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले आहे. गरिबांच्या दुःखात आपण सहभागी होऊन त्यांना कशी मदत करता येईल, या भावनेने हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविला. संस्थेचे हे सामाजिक कार्य गत पाच वर्षापासून सुरू असल्याची माहिती अध्यक्ष रामचंद्र ढोबळे यांनी दिली. तसेच सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

अनाथ मुलींच्या स्वनिर्मित साहित्यांची दखल

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : दिवाळीचा सण हा सर्वत्र उत्साहात साजरा होत असतो. या सणानिमित्ताने चौका-चौकात वेगवेगळे दुकान वेगवेगळ्या वस्तूंची विक्री करण्यासाठी थाटल्या जाते. यामध्येच अनाथ मुलींच्या माध्यमातून निर्मित झालेल्या वेगवेगळ्या वस्तूंसह आकाश कंदील विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. याच वस्तूंची पाहणी पोलीस निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांनी करून त्या वस्तू मुलींकडून खरेदी करून त्यांना आर्थिक आधार सहदिलासा दिला. मानवतेची आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शनाच देवकते यांनी घडवून आणले. पोलीस खात्यात कार्यरत असताना केवळ कायदा आणि सुव्यवस्था राखणे हेच पोलिसांचे काम आहे, ही व्याख्याच त्यांनी या प्रसंगातून मोडीत काढली. सामाजिक बांधिलकी जपत गरजू आणि अनाथ मुलींच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा त्यांचा हा प्रयत्न सध्या चर्चेचा विषय झाला आहे. अनाथ मुलींच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या स्वावलंबनासाठी शहरातील नागरिकांनी पुढे यावे आणि त्यांच्याकडून वस्तू खरेदी करून त्यांना आर्थिक धीर तसेच दिलासा द्यावा, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

वाघाडी येथील 'आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी' या आश्यालयातील ६६ मुलींनी स्वतःच्या हाताने तयार केलेले आकाशकंदील, रंगविलेल्या पणत्या विक्रीसाठी उपलब्ध केले असून यातून मिळालेल्या पैशातून त्यांचे शिक्षण ते पूर्ण करणार आहेत. डॉ.ठाकरे डायनोस्टिक सेंटरजवळ हे दुकान मुलींनी थाटले आहे.

समता सैनिक दलाची प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात



लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : समता सैनिक दलाच्या वतीने आयोजित पदाधिकारी प्रशिक्षण कार्यशाळा अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी ठरली. या कार्यशाळेत पदाधिकाऱ्यांची कार्यप्रणाली समजून घेण्यात आली.

कार्यशाळेचे उद्घाटन मार्शल संजय ओरके, महासचिव, समता सैनिक दल यांच्या हस्ते झाले. त्यांनी उद्घाटनपर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक मार्शल नीलध्वज कांबळे जिल्हाध्यक्ष यांनी केले.

या प्रशिक्षणात मार्शल धम्मा कांबळे यांनी 'भारत राष्ट्र' ही संकल्पना सखोल आणि सविस्तर समजावून सांगितली. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित भारत राष्ट्र निर्माणात समता सैनिक दलाची भूमिका काय असावी, यावर त्यांनी प्रभावी मार्गदर्शन केले. मार्शल हरिदास अघम यांनीही पदाधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचे संचालन मार्शल प्रशांत लोखंडे, जिल्हा महासचिव यांनी केले.

या प्रशिक्षण कार्यशाळेचा संपूर्ण खर्च ऑर्केस्ट्रा स्वरबहारने केला. याबद्दल स्वरबहारचे कौतुक करण्यात आले.

कार्यशाळेला जिल्ह्यातील पदाधिकारी व सैनिक हॉटेल ड्रॅगन यवतमाळ येथे मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी समता सैनिक दलाच्या सर्व मार्शल्सनी परिश्रम घेतले.

प्रकल्प कार्यालयासमोर भाकर ठेचा आंदोलन

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्ह्यातील झरी जामणी व केळापूर तालुक्यामधील पिढ्यानेपिढ्या जंगलात राहणाऱ्या अत्यंत मागास आदिम जमात पीव्हीटीजी, कोलाम, गोंड आणि प्रधान बांधवांच्या वनजमिनीचे दावे मंजूर न झाल्यास येत्या दिवाळीच्या दिवशी पांढरकवडा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनामध्ये जमातीचे लोक भाकर-ठेचा खाऊन दिवाळीचा दिवस घालवतील, अशी माहिती शामादादा कोलाम ब्रिगेड व बिगर सातबारा शेतकरी संघटनेच्या प्रदेशाध्यक्ष इंदिरा विलास बोंद्रे यांनी प्रशासनाला दिली आहे. रायपूर, दुर्भा, पिंपरी, कमळवेल्ली, बोरी तसेच इतर गावातील शेकडो आदिवासी बांधवांनी आपल्या हक्काच्या वन जमिनी नियमित करण्यासाठी कायदेशीर दावे सादर केले आहेत. या संदर्भात अप्पर आयुक्त आदिवासी विकास अमरावती यांनीही पत्र क्रमांक 55 42/ 2026 निर्गमित करून प्रशासनाला कार्यवाहीचे आदेश दिले आहे.

स्थानिक प्रशासकीय दिरंगाई आणि वनविभागाच्या उदासीनतेमुळे अनेक वैयक्तिक व सामूहिक वन हक्कदावे अनेक वर्षापासून प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. तर अनेक दावे किरकोळ व तांत्रिक दृष्टीचे कारण पुढे करून फेटाळण्यात आले आहेत. प्रलंबित असलेले सर्व वैयक्तिक व सामूहिक दावे नव्यावे तात्काळ मंजूर करण्यात यावे, किरकोळ त्रुटीमुळे फेटाळलेली दावे, नियम 2012 च्या साक्षीच्या आधारे पुनर्जीवित करण्यात यावेत, पात्र दावेदारांना वनपट्ट्याचे तात्काळ वाटप करण्यात यावे, अशा मागण्या संघटनेने केल्या आहे.

दिवाळी हा प्रकाशाचा सण असतानाही भूमीहिन आणि वंचित कोलाम शेतकऱ्यांना आपल्या न्याय हक्कासाठी अंधारात राहावे लागत आहे जर प्रशासनाने तात्काळ सकारात्मक पावले उचलली नाही तर दिवाळीच्या दिवशी शेकडो आदिवासी बांधव प्रकल्प कार्यालयासमोर भाकर ठेचा आंदोलन करणार असल्याची माहिती इंदिरा बोंद्रे यांनी दिली आहे तसे निवेदन जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले.

नगरपरिषदेचा आरोग्य विभाग अकार्यक्षम

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : शहरातील विविध समस्यांच्या संदर्भात अनेकदा वाघापूर परिसरातील रहिवासी स्थावरु नारायण वैद्य यांनी तक्रारी करीत, सुधारणा करण्यासंदर्भात अनेकदा निवेदन दिलीत मात्र त्यांच्या निवेदनावर कोणतीही दखल घेतली न गेल्याने अखेर त्यांनी अमरावती आयुक्त यांच्याकडे जाण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती लोकसूत्रला दिली. वाघापूर परिसरातील बनकर लेआउट मध्ये राहणारे थावरू नारायण वैद्य हे प्रशासकीय विभागात वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत होते, गेल्या वर्षभर आधीच ते निवृत्त झाले. त्यांनी शहरातील काही समस्यांबाबत थेट आरोग्य विभाग आणि मुख्याधिकारी यांच्याकडे तक्रारी नोंदविल्यात मात्र या तक्रारीची कोणीही दखल घेतली नाही. वैद्य यांनी अनेकदा निवेदन दिल्यानंतर उलट टपाली उत्तर मागण्याचा प्रयत्न केला, पण तेही नगरपरिषद देऊ शकले नाही. त्यांनी मुख्याधिकारी, आणि नगराध्यक्ष यांच्याकडे तक्रार दिली. या तक्रारीत नमूद केली की, नगरपरिषद विकास कार्यक्रमात शासनाने तरतूद केल्याप्रमाणे प्रत्येक एका किलोमीटर अंतरावर रस्त्याच्या कडेला नगरपरिषदेकडून मुत्रीघर आणि शौचालय असणे आवश्यक आहे. मात्र, आर्णी रोडवरील बस डेपोपासून ते वडगावपर्यंत एकही मुत्रीघर किंवा शौचालय नाही, हे परिस्थिती संपूर्ण शहरभर दिसून येत आहे. शहरातील निवासीधारकांकडून तसेच व्यवसायिकांकडून मोठ्या प्रमाणात कर आकारणी नगरपरिषद वसूल करते. यामध्ये वृक्ष कर, शिक्षण कर, मालमत्ता कर, लावलेला आहे. ज्या पद्धतीने कर वसूल केल्या जातो, त्या तुलनेत शहराच्या विकास कुठेच दिसून येत नाही. परिणामी, कराचा पैसा जातो कुठे, असा प्रश्नही त्यांनी विचारला आहे. जनतेला आरोग्य विषयक सर्व सुविधा पुरविणे हे आरोग्य विभागाचे खरे काम आहे. मात्र हा विभाग ते कामही नीट करीत नाही. याची त्यांनी अनेक उदाहरणे आपल्या निवेदनातून दिली आहेत. नगरपरिषदेच्या प्रशासकीय विभागाकडे अनेकदा अनेक व्यक्तींच्या तक्रारी येतात मात्र या तक्रारी मुख्याधिकारी यांच्याकडे दिल्या जात नाही. त्यामध्येच कक्ष अधिकारी बेदखल करून टाकतो असा आरोपी त्यांनी आपल्या पत्रकात केला आहे. यावर मुख्याधिकारी यांनी उत्तर दिलं नाही तर शेवटी आयुक्त अमरावती यांच्याकडे तक्रार करण्यात येईल, असे त्यांनी काल दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

श्रीअरविंद आश्रमाच्या शताब्दीनिमित्त यवतमाळात कार्यक्रम

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : महायोगी श्रीअरविंद हे आध्यात्मिक क्रांतिकारक होते. त्यांनी स्वतःच्या जीवनात क्रांती आणली तशीच सर्व मानवांच्या जीवनात यावी, यासाठी ते प्रयत्नशील होते. आपली साधना अधिकाधिक मानवाभिमुख व्हावे यासाठी प्रयत्नरत श्रीअरविंदांनी पृथ्वीवरच्या शेवटच्या माणसाची आध्यात्मिक उन्नती होईपर्यंत साधना सुरूच राहील, असे त्यांनी वचन दिले होते. १९१० मध्ये पांडेचेरीला आल्यावर त्यांनी आपली लेखन आणि आध्यात्मिक साधना सुरू केली. आजपासून बरोबर १०० वर्षांपूर्वी २४ नोव्हेंबर या दिवशी संध्याकाळी प्रार्थनेच्या वेळी साधकांनी श्रीअरविंदांमध्ये दिव्य चेतना विलीन झाल्याचा अनुभव घेतला. या सिद्धीदिनाची शताब्दी साजरी करताना आपणही अभ्यास व साधनेद्वारे चेतनेच्या उच्च पातळीवर पोचण्याचा प्रयत्न करूया, असे प्रतिपादन श्रीअरविंद साहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ. भारती सुदामे यांनी येथे केले. पॉंडिचेरी येथील योगी श्रीअरविंद आश्रम व सिद्धी दिवसाच्या शताब्दीनिमित्त यवतमाळातील योगी श्रीअरविंद केंद्राच्या वतीने येथील दाते कॉलेजमधील स्वागत सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी नागपूर येथील अभ्यासक श्री मनोहर ढोक, यवतमाळ केंद्राचे अध्यक्ष मधुकर येनुगवार, सचिव सुरेखा चोपडे, ॲड् डिंपल नक्षणे व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित होते. मनोहर ढोक: श्रीअरविंद आजच्या पिढीला माहिती आहेत ते क्रांतिकारक आणि झुंजार व्यक्तीच्या रूपात, पण त्यांचं काम यापेक्षा जास्त महत्त्वाचं आहे. त्यांना क्रांतीच करायची होती, पण ती केवळ राजकीय नव्हे तर वैचारिक आणि आध्यात्मिक. त्यासाठीचे प्रयत्न त्यांनी पॉंडेचरीला आल्यावर स्वतःच्या साधनेतून आणि लेखनातून

अभ्यास व साधनेद्वारा दिव्य चेतना अनुभवूया - डॉ. भारती सुदामे



केले. नवीन पिढी आज अर्जुनासारखी संभ्रमावस्थेत आहे, आपलं नेमकं कर्तव्य काय, आपण पथभ्रष्ट तर होत नाही ना, या सगळ्या प्रश्नांनी ती भांबावून गेली आहे म्हणून आज शंभर वर्षानंतरसुद्धा श्रीअरविंदाचे विचार नवीन पिढीला मार्गदर्शक ठरू शकतात. त्यांनी सांगितलेल्या मार्गावर जाऊन प्रगती करणे हे आपल्या हातात आहे. त्यातच आपल्याला आपलाही सिद्धी दिवस गवसू शकेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत मनोहर ढोक यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्रीअरविंद केंद्राची प्रार्थना झाली. त्यानंतर शताब्दीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेचा निकाल घोषित करण्यात आला. यावेळी निवडक विद्यार्थ्यांची मनोगते झाली. यवतमाळातील श्रीअरविंद केंद्राचे माजी सचिव स्व. सुरेश चोपडे यांच्या संग्रहातील श्री अरविंद पुस्तकांची प्रदर्शनी यावेळी मांडण्यात आली होती. कार्यक्रमाचे संचालन डॉ. वृंदा देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन मधुकर येनुगवार यांनी केले. सामूहिक वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी यवतमाळ अर्बन बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे, जिल्हा संघचालक विलास देशमुख, प्रांत कार्यवाहिका रोहिणी आठवले यांच्यासह विविध क्षेत्रातील गणमान्य नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धेतील विजेते: श्रीअरविंद आश्रमाची शताब्दी तसेच वंदे मातरम् गीताच्या सार्धशतीनिमित्त कुमारांसाठी श्रीअरविंद, श्रीमाताजी व वंदे मातरम् विषयावर सकाळी दाते कॉलेजमध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विविध शाळा-महाविद्यालयांतील १९ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. स्नेहल देशपांडे व बिपीन पाटील यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. विजेत्यांना संध्याकाळच्या व्याख्यानसत्रात प्रमाणपत्र देण्यात आले.प्रथम क्रमांक: जय खंडारे, दाते कॉलेज, द्वितीय क्रमांक: राशी गिरी, अणे महिला महाविद्यालय, तृतीय क्रमांक: मल्हार आचार्य, राज इंग्लिश स्कूल यांनी पटकाविला. आराध्या खडसे, राज इंग्लिश स्कूल व माही उभारे, नंदुरकर विद्यालय यांना विशेष पारितोषिक विभागून देण्यात आले.

पान १ वरून

गरिबांना मदतवाटपाचे ...

गरीबांना मदत करणे चुकीचे नाही. ती मदत नक्कीच केली पाहिजे. मात्र, मदतीचे इव्हेंट साजरे करून प्रसिद्धीचा हव्यास कशापायी हा खरा प्रश्न आहे. यंदा तर यवतमाळ जिल्ह्यात दोन कॅबिनेट मंत्री, एक राज्यमंत्री अन् खासदारांनीही नेहमीप्रमाणे गरीबांच्या समूहात जाऊन त्यांना दिवाळी भेट दिल्याचे जणू इव्हेंटच केले. मुळात गरीबांना मदत केल्याबद्दल त्यांचे अभिनंदनच. मात्र, मदतीचे फोटोसेशन करून सोशल मीडियासह सर्वत्र केलेला प्रसिद्धीचा बाजार हा मनाला अस्वस्थ करणारा आहे. हल्लीची राजकीय संस्कृती अशी बनली आहे की, जिथे वेदना आहेत तिथे कॅमेरे पाहोचतात. आदिवासींच्या पालावर, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या उंबरठ्यांवर जाऊन तिथे दिवाळी साजरी करण्याचे इव्हेंट केले जातात. गोरगरीबांच्या वेदनेपेक्षा लाभांचा राजकीय लाभांचा उद्देश अधिक असतो. वर्षभर ज्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होते, त्यांच्याच दारात दिवाळीच्या तोंडावर जाऊन मदतीचे कीट वाटप करणे अन् त्याचा गाजावाजा करणे ही गरीबांची थट्टा नव्हे का, असा प्रश्न उभा होतो.

कळंबच्या एकलासपूरमध्ये ...

भुकंपाचे सौम्य धक्के जाणवताच घटनेची माहिती जिल्हा प्रशासन व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला प्राप्त झाली. प्रशासनाने तातडीने सूत्रे हलवून एकलासपूर गाठत परिस्थितीचा आढावा घेतला. स्थानिक महसूल प्रशासनानेही गावातील परिस्थितीची माहिती घेत नागरिकांचे संभ्रम दूर केले. सध्या कळंब तालुक्यात परिस्थिती सामान्य असून कुठेही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही हे विशेष. भुकंपाचा हा धक्का ९ नोव्हेंबरला दुपारी ३ वाजून ०४ मिनिटांनी बसला. ही डेफ्ट ५ किमी एवढी होती.

स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी पकडला १४६ ग्रॅम गांजा

यवतमाळ : जिल्ह्यात गांजा तस्करी चे प्रकार दिवसेंदिवस वाढत असून गांजा नेमका येतो कुठून याबाबत पोलीस यंत्रणा मूळ ठिकाणापर्यंत अद्यापही पोहोचली नाही त्याचा परिणाम गांजा विक्रेत्यावर झाला असून त्यांनी आपले जाळे संपूर्ण जिल्हा भर पसरविले आहे. स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळच्या पोलीस पथकाने सात नोव्हेंबर रोजी गोपनीय माहिती मिळाल्याच्या आधारे नेर ते दारव्हा रोडवरील मुस्लिम कब्रस्तान जवळच्या हद्दीतील चमन नगर परिसरात गांजा विकल्या जात असल्याची माहिती मिळाली. यावरून पोलिसांनी त्या स्थळापर्यंत जाऊन पाहणी केली असता त्या ठिकाणी राहणाऱ्या शेख जफर शेख जब्बार वय ३६ हा गांजा विकत असल्याचे दिसून आले. सदर इसम पोलीस दिसताच पळण्याच्या परिस्थितीत होता. मात्र पोलिसांनी चारी बाजूने त्याला घेरून ताब्यात घेतले. त्याच्याकडे विचारपूस केल्यानंतर त्याने गांजा विकत असल्याची कबुली देत आपल्याकडील गांजा काढून दिला. पोलिसांनी त्याच्याकडून हिरव्या रंगाची पाने, बिया, फुले असलेला गांजा सदृश्य अमली पदार्थ, पॅकिंग सह १६५ ग्रॅम मिळून आला तर या त निवळ गांजाचे वजन १४६ ग्रॅम एवढे होते. या गांजाची किंमत एकूण ७३०० आहे. आरोपी शेख जफर शेख जब्बार याने गांजा अवैद्यरित्या बाळगल्याचे निष्पन्न झाल्यावर त्याच्या विरोधात कलम ८ क २० ब अन्वये गुन्हा दाखल केला असून अटक केली आहे. पुढील कारवाईसाठी आरोपीला नेर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ विभागाने केली.

दहावी-बारावीच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

यवतमाळ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अमरावतीने दहावी आणि बारावी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले असून या परीक्षा नऊ विभागात एकाच वेळी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतल्या जाणार असल्याचे विभागीय शिक्षण मंडळाने जाहीर केले आहे. बारावीच्या लेखी परीक्षा आठ फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान घेतल्या जाणार आहे. दहावीच्या लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते ३० मार्च या दरम्यान होणार आहेत. बारावीच्या प्रायोगिक तोंडी परीक्षा १० जानेवारी ते ६ फेब्रुवारी या दरम्यान घेतल्या जाणार आहेत. दहावी प्रायोगिक तोंडी परीक्षा १५ जानेवारी ते १३ फेब्रुवारी या वेळात घेतल्या जाणार आहे. दहावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू होऊन ३० मार्च रोजी संपणार आहे. बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी पासून सुरु होऊन १८ मार्च रोजी संपणार आहे. विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळावरून वेळापत्रक डाऊनलोड करून आपल्या विषयाच्या परीक्षा दिनांक, वेळ, याची खात्री करून घ्यावी असे विभागीय मंडळाने सुचविले आहे.

वर्षाकाठी अमली पदार्थाचे असंख्य गुन्हे, राजस्थानसह गुजरातमधून चालतेय हेराफेरी

तरुणाईला 'ड्रग्ज'चा नशेचा चटका



■ केशव सवळकर

यवतमाळ : राज्यासह जिल्ह्यात अमली पदार्थांच्या (ड्रग्ज) अवैध तस्करी व सेवनाने अत्यंत भयंकर रूप धारण केले असून, सुशिक्षित व मध्यमवर्गीय तरुणाई या विषाच्या आहारी जात आहे. मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिकसारख्या मोठ्या शहरांपासून ते यवतमाळ, धुळे, जळगाव आणि कोकणातील निमशहरी व ग्रामीण भागापर्यंत ड्रग्जच्या तस्करांनी आपले जाळे पसरवले आहे. जिल्ह्यातही तरुणाईला ड्रग्जच्या नशेचा चटका लागला असून दिवाळीच्या धामधूमीत असंख्य तरुणाई त्यात गुरफटल्याचे वास्तव पुढे येत आहे.

पोलीस प्रशासन आणि नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने चालू वर्षात (२०२६) राबविलेल्या विशेष मोहिमांच्या आकडेवारीवरून या समस्येची भीषणता स्पष्ट होते. चालू वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांतच (जानेवारी ते एप्रिल २०२६) महाराष्ट्र पोलिसांनी एनडीपीएस कायद्यांतर्गत हजारो छापे टाकून २५४ कोटींहून अधिक मूल्याचे अमली पदार्थ जप्त केले असून १६२६ पेक्षा जास्त आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. एकट्या मुंबईत चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहीत (जानेवारी ते मार्च २०२६) एनडीपीएस कायद्यांतर्गत १,३३२ गुन्हे नोंदवले गेले असून, १,२८७ आरोपींना अटक केली आहे. यात सर्वाधिक १,०८० गुन्हे हे थेट ड्रग्ज सेवनाचे तर २५२ गुन्हे बाळगणे व विक्रीचे आहेत. प्रामुख्याने या गुन्ह्यात यवतमाळसारखा जिल्हाही मागे नाही. जिल्ह्यातही एनडीपीएस ॲक्टअन्वये नोंदविल्या जाणाऱ्या गुन्ह्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. ग्रामीण व निमशहरी भागात स्थानिक गुन्हे शाखांच्या धडक कारवायांमुळे गांजा व एमडीच्या विक्रीवर चाप बसला असला, तरी तस्करीच्या नवनवीन क्लृप्त्या समोर येत आहेत.

आरोग्यावर ड्रग्जचे धोकादायक परिणाम

एमडी आणि सायकोट्रॉपिक गोळ्या मेंदूतील डोपामाइन रसायनाचा समतोल पूर्णपणे बिघडवतात, ज्यामुळे स्मरणशक्ती कमी होणे आणि अर्धांगवायूचा धोका निर्माण होतो.मानसिक आजार व गुन्हेगारी प्रवृत्ती: अमली पदार्थांच्या सेवनामुळे तीव्र नैराश्य पॅनिक अटॅक आणि भीती नाहीशी होऊन तीव्र आक्रमकता येते. मोठा गुन्हा करण्यापूर्वी आरोपी भीती मारण्यासाठी या ड्रग्जचा वापर करतात. डोडा पावडर व अफीमच्या घटकांमुळे यकृत आणि मूत्रपिंड कायमचे निकामी होतात. एमडी आणि अँटी-डिप्रेसन गोळ्यांच्या अतिसेवनाने हृदयाचे ठोके अचानक वाढून किंवा श्वसनसंस्था बंद पडून जागीच मृत्यू ओढवतो.

अमली पदार्थ येतात तरी कुठून ?

तपास यंत्रणांच्या चौकशीतून राज्यातील ड्रग्ज तस्करीच्या आंतरराज्यीय आणि आंतरराष्ट्रीय सप्लाय चेनचा पर्दाफाश होतो आहे. मध्यंतरी मुंबई, पुणे आणि नागपूर पोलिसांनी केलेल्या कारवायांमध्ये राजस्थानसह गुजरात कनेक्शन पुढे आले होते. राजस्थान व मध्य प्रदेशच्या सीमावर्ती भागातून अफीम, डोडा पावडर व हेरॉईनची तस्करी महाराष्ट्रात होते, तर गुजरातच्या सागरी मार्गाने किंवा बंदरांमधून येणारे अमली पदार्थ महामार्गाद्वारे राज्यात पोहोचवले जातात. गुजरात व राजस्थानमधील अवैध गुप्त लॅबमध्ये तयार होणारे एमडी ड्रग्ज महाराष्ट्रातील शहरांमध्ये पुरवले जात असल्याचे धाडीत उघड झाले आहे. बहुतांश गांजा हा ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या नक्षलग्रस्त / सीमावर्ती जंगलांमधून तेलंगणा आणि मराठवाड्यामार्गे उर्वरित महाराष्ट्रात आणला जातो.

गांजा, एमडी ते डोडा-पावडर

राज्यात सध्या प्रामुख्याने चार प्रकारच्या अमली पदार्थांचा पुरवठा केला जातो. त्यामध्ये एमडी / मेफेड्रॉन चांगलेच चर्चेत आहे. मॉली किंवा म्यावम्याव म्हणून ओळखले जाणारे हे सिंथेटिक (रासायनिक) ड्रग्ज तरुणाईमध्ये वेगाने पसरले आहे. कॉलेज तरुण आणि कामगार वर्गात सहज उपलब्ध होणारा पारंपारिक नशा तर यवतमाळसह ग्रामीण भागातही सहज उपलब्ध होतो आहे. पोस्त (अफीम) च्या बोंडांची साल दळून बनवली जाणारी डोडा-पावडर आणि खसखस प्रक्रियेतून तयार होणारे अफीम/हेरॉईनचे घटक हे प्रामुख्याने सराईत गुन्हेगार, लांब पल्ल्याचे ट्रक चालक आणि जुने व्यसनाधीन वापरतात.

ॲण्टी डिप्रेशन औषधांचा नशेसाठी प्रयोग

पोलिसांच्या कडक कारवाईमुळे गांजा आणि एमडीचे दर २० ते ३० टक्क्यांनी वाढल्याने तरुणाई आता मानसोपचाराच्या व झोपेच्या गोळ्यांच्या (उदा. अल्प्राझोलम, नायट्राझेपाम) अवैध वापराकडे वळली आहे. मेडिकलमधून काही औषधेच नशेसाठी खरेदी केली जात असल्याची माहिती पुढे येत आहे.

कायदे पडतात थिटे

अमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कायदा, १९८५ अंतर्गत प्रशासन अत्यंत आक्रमक पावले उचलत आहे. व्यावसायिक प्रमाणावर ( ) ड्रग्ज बाळगणे किंवा विकल्यास १० ते २० वर्षांपर्यंत सक्तमजुरी आणि २ लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. ड्रग्जच्या काळ्या पैशातून कमावलेली तस्करांची जंगम व स्थावर मालमत्ता थेट जप्त करण्याची कारवाई केली जात आहे. मात्र, हे कायदे थिटे पडत आहेत.

गुन्हेगारी टोळ्यांचा हात

आंतरराष्ट्रीय स्तरावर धागेदोर असलेल्या सलीम डोला टोळीसारख्या संघटित गुन्हेगारी सिंडिकेट्स, स्थानिक भाईगिरी करणाऱ्या टोळ्या आणि नायजेरियन तस्करांचे जाळे महाराष्ट्रातील नशा बाजारावर नियंत्रण ठेवून आहे.

पत्नी ठाण्यात : पतीने केले स्वत:ला जखमी

■ लोकसूत्र प्रतिनिधी




पुसद : पतीने त्याच्याच पत्नीसोबत वाद करून मारहाण केल्याची घटना घडल्यानंतर सदर महिला ही पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी आली. ती तक्रार नोंदवित असताना तिची तक्रार घेऊ नका, असा दबाव पतीने निर्माण करून पोलीस स्टेशनमध्येच वाद निर्माण केला. तेव्हा पोलिसांनी त्याला फटकारले. त्यामुळे पतीने स्वत:च्या छातीवर काचेने वार करून जखमी करून घेतल्याची घटना ७ नोव्हेंबरला रात्री साडेदहा वाजता घडली. या संदर्भात पोलिसांनी सांगितले की, पुसद येथील शिवाजी वार्डमध्ये राहणारा शेख आतिक शेख रशीद (२६) याने त्याच्या पत्नीला दारूच्या नशेमध्ये भांडण करून शिवीगाळ करून मारहाण केली. जखमी झालेली पत्नी थेट पोलीस स्टेशनला पतीविरुद्ध तक्रार देण्यासाठी आली. तिने तक्रार देणे सुरू केल्यानंतर आरोपी शेख अतीक शेख रशीद हा आपल्या मुलासह ठाण्यात आला. त्यानेही माझी पत्नी आहे, तुम्ही आमच्या संसारात पडू नका, असे पोलिसांना बजावले. तेव्हा पोलिसांनी तुम्ही दारू पिऊन आहात का, असे विचारले असता आरोपीने तुम्ही माझे काय वाकडे करू शकता, असा उलट प्रश्न करून कामात व्यत्यय आणला.

पोलिसांनी आरोपीला फटकारल्यानंतर आरोपी पोलीस स्टेशनच्या बाहेर गेला आणि त्याने काच आणून स्वत:च्या छातीवर स्वत:वर मारून घेतला आणि जोरजोरात ओरडून माझ्या बायकोविरोधात रिपोर्ट दाखल करा, अशी धमकी दिली. पोलिसांनी त्याला तत्काळ दवाखान्यात नेले. पत्नीची तक्रार दाखल करून घेतली.

याप्रकरणी पोलिसांनी पती असणारा आरोपी याच्याविरोधात कारवाई केली आहे. त्याने स्वत:वर वार केल्याने पोलिसांनी दुसराही गुन्हा त्याच्याविरोधात दाखल करून घेतला.













हे पत्रक मालक, प्रकाशक, मुद्रक राहुल माणिकराव ठाकरे यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर ४४००१८ येथे मुद्रित करून दै. लोकसूत्र 'शिवभवन' दत्तचौक यवतमाळ-४४५००१ येथे प्रकाशित केले. कार्यकारी संपादक केशव मारोतराव सवळकर (संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) (सर्व वाद यवतमाळ न्यायालया अंतर्गत) ई-मेल : loksutra@gmail.com